# वसई विरार शहर महानगरपालिका

# जाहिर सूचना

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२२ अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांतर्गत स्पर्धा राबविणे बाबत.**

वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत **"स्वच्छ सर्वेक्षण", "एकल वापर प्लास्टिक बंदी", "जलशक्ती अभियान", "राष्ट्रीय स्वच्छ वायु उपक्रम" व "माझी वसुंधरा"** अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे करिता शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरण बद्दल जाणीव जागृती निर्माण करणेकामी सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणेशोत्सव २०२१ अंतर्गत उत्कृष्ठ प्रतिसाद मिळाला असून त्या अनुषंगाने सर्व सार्वजनिक गणेश मंडळांना आवाहन करण्यात येते की, गणेशोत्सव २०२२ हा देखिल **पर्यावरणपूरक** पध्दतीने साजरा करावयाचा आहे.

त्या अनुषंगाने शहरातील नागरिकांमध्ये सार्वजनिक व पर्यावरण विषयक जनजागृती होणे कामी वसई विरार शहर महानगरपालिकेकडून **(पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२२ अंतर्गत)** विविध सामाजिक उपक्रमांतर्गत स्पर्धा राबविणेचे आयोजन करण्यात येत असून स्पर्धेमध्ये खालील उपक्रम राबविण्याचे आहेत. सदर बाबत मा. राज्य शासन व मा. उच्च न्यायालय यांचे मार्गदर्शन सुचना व माहिती www.vvcmc.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

## प्रस्तावित उपक्रमाची रुपरेषा व गुणांकन.

| अ.क्र. | तपशील | गुण |
|---|---|---|
| १. | **पर्यावरणपूरक गणेश मूर्ती प्रतिष्ठापना, आगमन व विसर्जन करणे :-**<br>१. शाडूच्या मुर्तीची प्रतिष्ठापना – (१० गुण)<br>२. शासन आदेशाप्रमाणे गणेश मुर्तींची ऊंची, आरस व सजावट – (१० गुण)<br>३. पर्यावरण पुरक साहित्यांचाच वापर सजावटीसाठी व इतर प्रयोजनासाठी करणे (प्लास्टिक, थर्माकॉल, प्लास्टिक प्लेट, चमचा, ग्लास इ. न वापरणे) – (३० गुण) | ५० |
| २. | **घनकचरा व्यवस्थापन :-** (मागील गणेश विसर्जन काळापासून केलेली कामे)<br>अ) ओला व सुका कचरा वेगळा करणे बाबत जनजागृती करीता केलेले उपक्रम व प्रत्यक्षात किती ठिकाणी करणेत येते - २० गुण<br>ब) ओला कचऱ्यापासून कंपोस्टिंग बाबत जनजागृती करीता केलेले उपक्रम व प्रत्यक्षात किती ठिकाणी करणेत येते - २० गुण<br>क) सुका कचऱ्याचा पुर्न:वापर करणे बाबत जनजागृती करीता केलेले उपक्रम व प्रत्यक्षात किती ठिकाणी करणेत येते - २० गुण<br>ड) E-Waste वेगळा संकलीत करणे बाबत जनजागृती करीता केलेले उपक्रम व प्रत्यक्षात किती ठिकाणी करणेत येते - २० गुण<br>इ) निर्माल्यापासून खत निर्मिती करणे बाबत जनजागृती करीता केलेले उपक्रम व प्रत्यक्षात किती ठिकाणी करणेत येते - २० गुण | १०० |
| ३. | १) सिंगल युज प्लास्टिक वापर बंदी बाबत घेतलेले विविध उपक्रम – २० गुण<br>२) सार्वजनिक गणेश उत्सव दरम्यान वापरणेत आलेले पर्यावरण पुरक साहित्यांचा तपशील छायाचित्रांसह – ३० गुण | ५० |
| ४. | **वृक्षारोपण व संवर्धन करणे :-**<br>१) सार्वजनिक गणेश मंडळा मार्फत वर्ष भरात केलेल्या वृक्ष लागवड (स्थानिक प्रजातीची वृक्ष लागवड) : | ५० |
| ५. | **हरीत शपथ (माझी वसुंधरा अभियान) :-**<br>अ) किती ई-प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे : २५ गुण<br>ब) आपण घेतलेल्या हरित शपथेनुसार कृती करुन सोशल मीडियावर प्रसार करणे : २५ गुण | ५० |

| | | |
|---|---|---|
| ६. | **जनजागृती उपक्रम :-**<br>अ) पर्यावरण संवर्धन विषयक पथनाट्य करणे : १० गुण<br>ब) चित्रकला व रांगोळी स्पर्धा (पर्यावरण व स्वच्छता) : १० गुण<br>क) पारंपारिक उर्जासंवर्धन करिता जनजागृती वर सायकल रॅली : १० गुण<br>ड) इलेक्ट्रिक वाहन वापरायला चालना देणे : १० गुण<br>इ) भिंत्ती चित्र रंगविणे (पर्यावरण व स्वच्छता) : १० गुण | ५० |
| | **एकूण** | **३५०** |

वरिलप्रमाणे विविध माध्यमातून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत संपूर्ण माहिती व त्याच बरोबर कामाच्या ठिकाणाचे, काम करतेवेळी व काम पूर्ण झाल्यावर **(Geo tag)** फोटो काढणे बंधनकारक आहे. याप्रमाणे सदर स्पर्धा कालावधीत करणेत आलेल्या कामाचा लेखी अहवाल तसेच PPT प्रेझेन्टेशन तयार करून नियंत्रण कक्ष (पर्यावरण विभाग वसई विरार शहर महानगरपालिका) येथे दि. १४/०९/२०२२ अखेर विहीत मुदतीत सादर करण्यात यावे.

स्पर्धेच्या कार्यप्रणालीत काही बदल करणेचे असलेस त्याचे अधिकार स्पर्धेचे मुख्यनियंत्रण अधिकारी यांच्याकडे राहतील. वरिल स्पर्धेच्या माध्यमातून तीन अंतिम विजेते निश्चित करण्यात येऊन त्याना खालील प्रमाणे पारितोषिक स्वरुपात रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

## स्पर्धेतील बक्षिसे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | गुणानुक्रमांक | बक्षिसे |
|---|---|---|
| १. | प्रथम पारितोषिक | रु. २५,००१/- |
| २. | द्वितीय पारितोषिक | रु. १५,००१/- |
| ३. | तृतीय पारितोषिक | रु. १०,००१/- |
| ४. | उत्तेजनार्थ १० पारितोषिके | रु. १००१/- |

**सदर स्पर्धा ही दि. ३१/०८/२०२२ पासुन दि. ०५/०९/२०२२ अखेर घेण्यात येणार असून सदर स्पर्धेत आपला सहभाग लेखी स्वरुपात नोंदविण्याकरीता दि. ३१/०८/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत संबंधित प्रभाग समिती कार्यालय पर्यावरण विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका येथे संपर्क साधणे अपेक्षित आहे.**

तसेच सदर स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांपैकी विजेत्या स्पर्धकाला महापालिकेतर्फे धनादेश व प्रशस्तीपत्रक देण्यात येईल. तसेच स्पर्धेत भाग घेणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

परिक्षणाकरीता परिक्षक समिती स्थापन करणे.

१) परिमंडळ – उपायुक्त
२) पत्रकार प्रतिनिधी
३) N.G.O. प्रतिनिधी
४) सहा. आयुक्त
५) उप-अभियंता

सदर स्पर्धेचे सर्व अधिकार हे मा. आयुक्त सो. यांचे कडे राखीव ठेवण्यात येत आहे.

अतिरिक्त आयुक्त (पर्यावरण)
वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रति,

मा.संपादक,

---------------------------

---------------------------

**विषय :-** सार्वजनिक गणेशोत्सव २०२२ अंतर्गत पर्यावरणपूरक गणेशमुर्ती व सजावट करणेकामी स्पर्धेचे आयोजन करणे बाबत.

सोबत दिलेली जाहिर सुचना आपल्या वर्तमानपत्रात लवकर प्रसिद्ध करावी. सदरची जाहिरात कमीत कमी जागेत लहान फॉन्ट मध्ये देण्यात यावी, जाहिरात प्रसिद्ध करतेवेळी माहिती व जनसंपर्क महासंचालक कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन मान्य दर प्रमाणानुसार प्रसिद्ध करणेत यावी.

सदरची जाहिरात आपल्या वर्तमानपत्रात दि.......................... रोजी प्रसिद्ध करुन वर्तमानपत्राच्या किमान ५ प्रती या कार्यालयात सादर कराव्यात. याबाबतचे नियमानुसार शुल्क वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयामार्फत अदा करणेत येईल, तसेच कार्यालयात बिल सादर करतेवेळी दिलेल्या आदेशांचे छायाप्रत, आदेशासोबत जोडलेली जाहिरात छायाप्रत, तसेच शासन मान्यता प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडून पाठविणे आवश्यक राहील.

संबंधित वृत्तपत्राच्या जाहिरातीचे शासनमान्य दरानुसार बिल सादर करावे.

अतिरिक्त आयुक्त (पर्यावरण)
वसई-विरार शहर महानगरपालिका